जिल्हा परिषद,गडचिरोली

बांधकाम विभाग

काम वाटप समितीमार्फत बांधकामे वाटपाकरीता जाहिर सुचना पत्र क्र. 01/2026-27

जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत बांधकाम विभागातील खालील कामाकरिता महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2010/275/प्र.क्र.172/पंरा-7 दिनांक- 19 ऑक्टोबर, 2011 मधिल परिच्छेद क्रमांक- 04 मधिल उपपरिच्छेद 5 मध्ये नमुद कार्यपद्धती नुसार तसेच ग्राम विभाग व जलसंधारण विभाग शा. नि.क्र.झेडपीए-2015 / प्र.क्र. 10 /वित्त -9 दिनांक- 25 मार्च 2015 आणि महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: झेडपीए-2021/प्र.क्र.45/वित्त-9 दिनांक- 20/09/2024 नुसार जिल्ह्यातील इच्छुक ग्रामपंचायती यांचेकडुनच खालील नमुद कामांकरीता याव्दारे अर्ज मागविण्यात येत आहे.

अ.क्र.	मंजुर कामाचे नांव	तालुका	अंदाजित किमत (लक्ष)	ग्रा.पं.नाव
1	2	3	4	5
आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन 2025-26				
1	मौजा गोविंदपूर ग्रा.पं.येवली येथे सभागृह बांधकाम करणे ता.जि. गडचिरोली	गडचिरोली	1200000.00	येवली
	एकुण		1200000.00	
आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन 2024-25				
8	मौजा झिंगानूर प्रा.आ. केंद्रात नविन प्रयोगशाळा कक्षाचे बांधकाम करणे.	सिरोंचा	1500000.00	
	एकुण		1500000.00	
	एकुण किंमत		2700000.00	

वर नमुद कामांकरिता ग्रामपंचायती यांचेकडुन अर्ज मागवितांना संबधितास खालील सुचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

ग्रामपंचायतीनी कामाची मागणी करतांना खालीलप्रमाणे कागदपत्र विहित दिनांकापूर्वी सादर करणे आवश्यक राहील.

1) कामाचे मागणीपत्र सरपंच/सचिव यांचे संयुक्त स्वाक्षरीने ग्राम पंचायतीच्या ठरावासह.

2) ग्रामपंचायतीच्या उत्पनाचे संवर्ग विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र

3) ग्रामपंचायतीचे नावाचे GST रजिस्टेशन प्रमाणपत्र (असल्यास)

4) ग्रामपंचायतीचे नावाचे TAN/PAN प्रमाणपत्र (असल्यास)

5) काम ग्रामपंचायतीच्या हद्दीत असल्याबाबत सरपंच/सचिव यांचे संयुक्त स्वाक्षरीचे गावठाण प्रमाणपत्र

6) ग्रामपंचायतीला कामाची मागणी करतांना वरिल प्रमाणपत्रासोबत रु. 10.00 लक्षापर्यंतच्या कामाला करारनामा करण्याकरिता रु.500 चे स्टँम्प पेपर सादर करणे अनिवार्य राहील तसेच 10.00 लक्षाचे वरिल कामाला प्रत्येक लक्षाला 100 रु. प्रमाणे स्टॅम्प पेपरची आकारणी करावी लागेल.

7) परिपत्रक/जिपग/बांधवि/निविदा/2584/2021 दिनांक-14 जुलै 2021 अन्वये निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक/ अनिवार्य राहिल.

8) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2010/275/प्र.क्र.172/पंरा-7 दिनांक 19 ऑक्टोबर, 2011 व महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.: निविदा/2021/प्र.क्र. 78/बांधकाम-4 दिनांक 27 मे 2021 व काम वाटप समिती सभा दिनांक- 14 जुन 2021 च्या अनुषंगाने परिपत्रक/जिपग/बांधवि/निविदा/2584/2021 दिनांक- 05/07/2021 अन्वये निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक / अनिवार्य राहिल.

9) **ग्रामपंचायतीकडे सुरु असलेल्या कामाची यादी प्रलंबित कामाची संख्या व सदर ग्रामपंचायतीस काम देण्यात यावे किंवा कसे याबाबत उप अभियंता (बांधकाम) ----------जि.प.गडचिरोली यांचे कामा बाबत अभिप्राय प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.**

10) **वरिलप्रमाणे ग्रामपंचायतीचे मागणीसह इतर दस्ताऐवज सादर केल्याची निविदा शाखा बांधकाम विभाग जि.प.गडचिरोली यांचेकडुन पोहच घ्यावी.**

11) अट क्रमांक 1 ते 6 चे अधिन राहून ग्रामपंचायतीने मागणी केलेली कामे ग्रामपंचायतीकरीता आवंटीत करण्यात येतील.

12) ग्रामपंचायतीकरीता आरक्षीत केलेली कामे वगळुन उर्वरीत (ग्रामपंचायतीने मागणी न केलेले) कामाचे सुशिक्षीत बेरोजगार अभियंता, मजुर सहकारी संस्था व पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांचे मध्ये 26:40:34 या प्रमाणात कामे आरक्षीत करण्यात येतील व आरक्षीत करण्यात आलेल्या कामाची यादी मंजुरीनंतर www.mahatender.gov.in या वेबसाईटवर E-Tender 5.00 लक्षाचे वरिल व 5.00 लक्षाचे आतील कामे www.zpgadchiroli.org लॉटरी पध्दतीने या वेबसाईटवर वाटप करण्या करीता प्रकाशीत करण्यात येईल.

13) ग्रामपंचायतींनी रस्त्याची कामाची मागणी त्या कामासाठीची अवजारे किंवा यंत्रे असतील वा जर ग्रामपंचायती अशी अवजारे व यंत्रे भाडयाने घेऊ शकत असतील (तत्सबंधीचे प्रमाणपत्र जोडावे) त्यानुसार समिती योग्य तो निर्णय घेईल. डांबरीकरणाची तसेच इमारतीच्या वॉटर प्रुफींग व विद्यृतीकरणाची कामे ग्रामपंचायतीस दिली जाणार नाही.

14) ज्या ग्रामपंचायती / सुशिक्षित बेरोजगार अभियता / मजुर सहकारी संस्था / कंत्राटदार (खुला) मुदतीत काम पूर्ण करणार नाहीत तसेच मुदतीत सुरु करणार नाहीत त्यांचेवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,गडचिरोली यांचे कार्या.आदेश क्र./जिपग/बांवि/सलेअ/दंड आकारणी/6137/2020 दिनांक 26.11.2020 नुसार दंडात्मक कार्यवाई करण्यांत येईल व दंडाची रक्कम देयकातुन वसुल करण्यांत येईल. दंडात्मक कार्यवाई टाळणेसाठी मुदतीत काम पूर्ण करणे यंत्रणेच्या हिताचे राहील.

15) ब-याच वेळेस जुन्या कामामधील किरकोळ कामे दिर्घ कालावधीसाठी प्रलंबीत राहतात व बांधकामाची उपयोगिता कमी होते यास्तव जुने बांधकामे पूर्ण झाल्याशिवाय नविन बांधकामाची देयके अदा केली जाणार नाही.

16) **पार पाडलेल्या कामाचे भुगतान अनुदानाचे उपलब्धतेनुसार करण्यांत येईल. निधी खर्च करण्याच्या कालावधीची मर्यादा संपल्यानंतर काम विलंबाने पुर्ण झाल्यास देय रक्कमेचे भुगतान करण्याची जबाबदारी विभागाची राहणार नाही. तसेच उपलब्ध निधीचे अधिन राहुन कामाचे कार्यारंभ आदेश पारित केले जातील.**

17) नविन इमारत बांधकाम तसेच ईमारत दुरुस्तीच्या कामांदरम्यान जागेच्या उपलब्धेनुसार सावली देणारी कमीतकमी दहा तसेच कमीत कमी दहा फळझाडे लावणे बंधनकारक आहे. कंत्राट कालावधीत उपविभागीय अभियंता यांचे मार्गदर्शनाखाली कुंपन करणे तसेच रोपे जगण्यासाठी पाणी,खत,औषध फवारणी इत्यादी बाबी कंत्राट कालावधीत व दोषनिवारण कालावधीत करणे बंधनकारक करण्यात येत आहे.देयकासोबत वरिलप्रमाणे कालावधीत कार्यवाही झालेबाबत प्रमाणपत्र सादर करावे.

18) सर्व प्रकारच्या इमारत बांधकामासाठी आरसीसी काम अगोदर पूर्ण करुन घ्यावे व त्यानंतरच विट बांधकाम करावी. तसेच बिम आणि स्लॅब यांचे कॉन्क्रीटीग एकत्रीत पणे करणे अनिवार्य राहील. तसेच इमारतीच्या प-लाय ॲश ब्रिक चा प्राधान्याने वापर करावा.

19) कोणत्याही प्रकारची दुरुस्तीची कामे सुरु करण्यापूर्वी तीन फोटो (वेगवेगळे) तसेच सबंधीत चल देयकासोबत दुरुस्ती नंतरचे फोटो असल्याशिवाय देयक पासीत केले जाणार नाही. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर तीन फोटो अंतिम देयकासोबत जोडावे. सदर बाब इमारत तसेच रस्ते दुरुस्तीसाठी लागु राहील.

20) प्रत्येक ग्रामपंचायत आपला TAN/PAN/GST कळविणे बंधनकारक आहे. TAN/PAN/GST शिवाय कामाचे देयक अदा केले जाणार नाही.

21) All Grampanchayat & Contractor shall submit a certificate to the effect that "All the Payments to the labour/staff are made in bank accounts of staff linked to unique Identification Number (AADHAR CARD)" The certificate shall be submitted by the contrator within 60 days from the commencement of contract. If the time period of contract is less than 60 days then such certificate shall be submitted within 15 days from the date of commencement of contract.

1	जाहिर सुचना www.zpgadchiroli.org या वेबसाईटवर प्रसिध्दीचा दिनांक -	26.11.2026
2	ग्रा.पं.नी कामाकरिता मागाणी अर्ज सादर करण्याचा अंतीम दिनांक -	03.12.2026
3	ग्रा.पं.ची मागणी असलेली कामे तसेच ग्रामपंचायतीची मागणी नसलेली कामे वगळुन मजुर सहकारी संस्था,सुशिक्षित बेरोजगार अभियंता व पात्र नोंदणीकृत नियमित कंत्राटदार यांच्यामध्ये 26:40:34 या प्रमाणात कामे आरक्षीत करण्याकरिता काम वाटप समिती सभेचा संभाव्य दिनांक -	04.12.2026

अध्यक्ष,
काम वाटप समिती तथा
अपर मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,गडचिरोली

सदस्य सचिव
काम वाटप समिती तथा
कार्यकारी अभियंता (बांधकाम)
जिल्हा परिषद, गडचिरोली.